महाराष्ट्र शासन

क्रमांक : प्राशास्थ १८०८/(३८९/०८)/प्राशि-३
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ३१ जुलै, २००८

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद

विषय : स्थलांतरास परवानगी मिळण्याबाबत
सौ.गंधारीबाई प्रतिष्ठान, औरंगाबाद संचलित कै.गणपतराव जगताप, प्राथ.विद्यामंदिर जटवाडारोड, हर्सुल,औरंगाबाद

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, सौ.गंधारीबाई प्रतिष्ठान औरंगाबाद संचलित कै.गणपतराव जगताप,प्राथ.विद्यामंदिर जटवाडारोड, हर्सुल, औरंगाबाद या शाळेचे मुकुंदवाडी परिसर नवीन रेल्वे स्टेशन औरंगाबाद येथे केलेल्या स्थलांतरास खालील अटींच्या अधीन राहून शासनाची कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे :--

१) मूळ ठिकाणच्या शाळेतील विद्यार्थ्यांची सोय नजिकच्या मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेत केलेली असावी.

२) स्थलांतरीत प्राथमिक शाळेतील कोणत्याही वर्गासाठी, कोणत्याही कारणास्तव सरासरी हजेरीची अट शिथिल केली जाणार नाही.

३) स्थलांतरीत शाळेसाठी लागणारी आवश्यक ती जागा, फर्निचर, ग्रंथालय, खेळाचे मैदान तसेच शैक्षणिक व भौतिक सुविधांची पूर्तता संस्थेने केली पाहिजे.

४) स्थलांतरीत ठिकाणच्या अन्य शाळांवर सदरहू शाळेचा विपरित परिणाम होणार नाही याची संस्थेने काळजी घ्यावी.

५) पूर्वीच्या ठिकाणच्या प्राथमिक शाळेतील नियमानुसार मान्य पदांवरील, आरक्षणानुसार नियुक्ती केलेले, क्षेत्रीय अधिका-यांची मान्यता असलेले व कायम असलेले सर्व अर्हताप्राप्त शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना स्थलांतरीत शाळेत सामावून घेण्यात यावेत व तसे हमीपत्र संस्थेकडून रु.१००/- च्या बंधपत्रावर नोटोराईज्ड करुन घ्यावे.

६) या स्थलांतरीत शाळेच्या बाबतीत शासन परवानगीच्या अटी व शर्तीमध्ये किंवा मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी

७) प्रस्तावित ठिकाणी पटसंख्येअभावी अतिरिक्त शिक्षक झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संस्थेवर राहील.

८) स्थलांतरीत शाळा मूळ ठिकाणी अनुदानाच्या ज्या तत्वावर होती, त्याच तत्वावर स्थलांतरीत ठिकाणी मंजूरी देण्यात यावी.

९) सदरहू स्थलांतरासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिका-यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यास स्थलांतरास देण्यात आलेली मंजूरी कोणतीही पूर्व सूचना न देता तात्काळ रद्द करण्यात येईल.

२. सदरहू संस्थेच्या प्राथमिक शाळेत स्थलांतराची मंजूरी देण्याबाबत आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास कळविण्यात यावे.

( सुरेश पेडगांवकर )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत -- शिक्षण संचालक (प्राथमिक), म.रा.,पुणे
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प., औरंगाबाद
निवड नस्ती / प्राशि-३